# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जालना

(निवडणूक शाखा)

फोन नं.24582-225802 Email: dydeojalna 22@gmail.com

जा. क्र.2026/निवडणूक/Enumeration Forms , मतदार यादी छपाई /ईनिविदा/कावी दिनांक 11/05/2026

**विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे अनुषंगाने मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेला Enumeration Forms, मतदार यादी, बीएलओ रजिस्टर,नोटीस व इतर अनुषंगिक बाबींची छपाई करण्याबाबत ई-निविदा सुचना**

मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्या यांच्या निर्देशानुसार आगामी मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या पुर्व तयारीकरिता जालना जिल्ह्यातील मतदारांचा तपशिल असलेला Enumeration Forms, मतदार यादी तसेच इतर अनुषंगिक छपाईचे काम करण्यासाठी इच्छुक अनुभवी व सुयोग्य अभिक-यांकडून विहित नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे मागविण्यात येत आहेत. सदरची http:www.mahaetendrs.gov.in या वेबसाईवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्यात येत आहे.

**कामाचे नाव** – जालना जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघांतर्गत मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेला Enumeration Forms, मतदार यादी व इतर अनुषंगिक छपाई पुरवठा करणेबाबत.

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रु.75,00,000/- |
| ई-निविदा फॉर्म शुल्क | रु.20,000/- (विनापरतावा) |
| इसारा /बयाणा (EMD) रक्कम | रु.1,80,000/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रु.2,25,000/- |
| ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. 12/05/2026 सकाळी 11.00 वाजता |
| ई-निविदा भरण्याचा कालावधी | दि. 12/05/2026 सकाळी 11.00 वा. पासून (मंगळवार) ते दि. 18/05/2026 सकाळी 05.00 पर्यंत (सोमवार) |
| ई-निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. 12/05/2026 सायंकाळी 05.00 वा. पर्यंत |
| ई-निविदा फॉर्म क्रमांक – 1 (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. 18/05/2026 रोजी दुपारी12.00 पर्यंत किंवा तद्नंतर |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

1 सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)

2 प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक जालना यांनी स्वतः राखून ठेवले आहेत. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

3 सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.

4 निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करून घ्यावी

5 सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

(आशिमा मित्तल) भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, जालना**

# Enumeration Forms छपाई, मतदार यादींची छपाई करण्याबाबत ई-निविदा सुचना अटी व शर्ती

आगामी मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे अनुषंगाने मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेला Enumeration Forms छपाई, मतदार यादी, बीएलओ रजिस्टर, नोटीस व इतर अनुषंगिक छपाई करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे मागविण्यात येत आहे. ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**I) लिफाफा क्र.1 (तांत्रिक लिफाफा)**

लिफाफा क्र.1 (तांत्रिक लिफाफा) मध्ये निविदा, निविदा अर्जासह खालील स्वसाक्षंकित कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर Briefcase I मध्ये अपलोड करावेत.

1. निविदा अर्ज फी रु.20,000/- (अक्षरी – वीस हजार रुपये केवळ) तसेच इसारा रक्कम रु.1,80,000/- (अक्षरी –एक लक्षऐंशी हजार रुपये केवळ) www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online Payment पध्दतीने करावे. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. सदर Online Payment ची पावती लिफाफा क्र.1 सोबत जमा करावी. इसारा रक्कम भरलेली नसल्यास निविदेचा विचार करणेत येणार नाही.
2. इसारा रक्कम भरण्यातून सूट असल्यास तसे दर्शविणारे संबंधित विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
3. आयकर पॅन कार्ड प्रत व आयकर विवरणपत्राची (मागील लगतच्या 3 वर्षाची प्रत)
4. GST नोंदणी प्रमाणपत्र
5. UDYAM Registration Certificate (उद्योग आधार प्रमाणपत्र)
6. मागील लगतच्या 1 वर्षाचा GST क्लिअरन्स प्रमाणपत्र
7. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम 1948 नुसार नोंदणी प्रमाणपत्र (नुतनीकरणासह).
8. मतदार यादी छपाई व तत्सम निवडणूक विषयक छपाईच्या पुरवठा केल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
9. मागील 3 वर्षाचे सरासरी आर्थिक उलाढालीबाबत (किमान रु.20/- लक्ष पेक्षा जास्त असावे) सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र.
   (Turnover certificate last three years 2022-23, 2023-24, 2024-25)
10. काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याबाबतचे स्वघोषणापत्र.
11. अटी व शर्ती मान्यतेबाबत शपथपत्र (नमुना सोबत जोडला आहे त्याच नमुन्यात असावे)
12. आवश्यक यंत्र सामग्री व मनुष्यबळ /कर्मचारी यांची यादी
13. निविदेसोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या व नोंदणी प्रमाणपत्रांच्या प्रती स्वसाक्षांकीत केलेल्या असल्या पाहिजे.

**महत्वाचे :-** अट क्र. 1 ते 13 मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांपैकी एक जरी दस्तऐवज उपलब्ध नसल्यास निविदा अग्राह्य समजण्यात येऊन निविदेचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येणार नाही.

(आशिमा मित्तल) भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, जालना**

# निविदेच्या अटी व शर्ती

1. ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http:mahaetendrs.gov.in या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) **दि. 12/05/2026 रोजी पासून** Upload करता येईल, ऑफ लाईन निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.
2. **मा. मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक ईएलआर -2025/प्र.क्र.51/25/निवडणूक – 6 दिनांक 13 जानेवारी 2026 नुसार प्रति पृष्ठ (पाटपोट) A-4 साईज झेरॉक्सचा अधिकतम दर हा 0.70/- पैसे पेक्षा जास्त नसावा. त्यापेक्षा जास्त दर नमुद केलेली निविदा मान्य करण्यात येणार नाही याची गांभीर्याने दक्षता घेण्यात यावी.**
3. वरील सर्व कागदपत्रे अधिकृतरित्या प्रमाणित केलेली असावीत. सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन भरण्यात यावीत व त्यावर निविदाधारकाने स्वतःची ई-स्वाक्षरी (डिजीटल सिग्नेचर) करणे अनिवार्य आहे.
4. लिफाफा B म्हणजेच Commercial (BOQ) फक्त ऑनलाईन पध्दतीनेच भरावा. लिफाफा क्र.01 ची तपासणी केल्यानंतर पात्र कंत्राटदार (निविदाधारक) यांचा लिफाफा क्र.02 उघडण्यात येईल.
5. अभिकर्त्याने दिलेले दर सर्व कर समावेशक असणे बंधनकारक राहील. अनुज्ञेय आयकर आदी रक्कमांची कपात देयक अदा करताना करण्यात येईल.
6. ऑनलाईन निविदा जाहीरातीचे दिनांकापासून **दि. 18/05/2026 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत** स्विकारल्या जातील. विहीत वेळेनंतर कोणतीही निविदा स्विकारली जाणार नाही अथवा त्यावर विचार केला जाणार नाही.
7. मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेला Enumeration Forms, मतदार याद्या व इतर अनुषंगिक छपाईसाठी कागद साईज A-4 पेपरवर 80 GSM असावा.
8. मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेला Enumeration Forms छपाई कामकाजासाठी लागणारा अनुषंगिक खर्च जसे यादीचे बाईडिंग, मशिन/मशिनची शाई, वाहतुक खर्च निविदाधारकांना सोसावा लागेल. तसेच छपाई झाल्यानंतर सदर मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेला Enumeration Forms किंवा तत्सम साहित्य विहीत वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे सुस्थितीत पोहचविणे बंधनकारक राहील.
9. ठेकेदारास आपलेवतीने सदरचे काम दुस-या व्यक्तीस / संस्थेस देता येणार नाही व एजंट नेमता येणार नाही. सदरचे कामाबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जालना यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक राहिल.
10. निविदा मंजुर झालेल्या निविदाधारकाने तात्काळ रु.500/-च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन त्यांच्याकडून अनुज्ञेय किंमतीच्या टक्केवारी नुसार राष्ट्रीय बॅकेकडील डी.डी./ राष्ट्रीयकृत बॅकेची हमी मा.जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे नावे जमा करावे लागेल.
11. करारनाम्यातील कोणत्याही अटी /शर्तीबाबत जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी जालना यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहिल. तसेच मंजुर निविदाधारकास जिल्हा निवडणूक अधिकारी जालनायांचे कार्यालयातून छपाई कामकाजासाठी देण्यात येणा-या मतदार यादीच्या पीडीएफ सीडी/पेन ड्राईव्ह मधील संपुर्ण कामकाज हे सीडी/पेन ड्राईव्ह सुपुर्त केल्यानंतर त्याच दिवशी पुर्ण करुन द्यावे लागेल व या बाबीचा अंतर्भाव करारनाम्यात करावा लागेल.
12. मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेला Enumeration Forms, मतदार यादी व इतर निवडणुक विषयक साहित्य गोपनिय स्वरुपाचे असल्याने आपणाकडून या कार्यालयाशिवाय इतर कोणतेही राजकीय पक्ष/संस्था/व्यक्तीस साहित्य पुरवठा होणार नाही याची लेखी हमी देणे बंधनकारक राहील.
13. ई-निविदा मुदतीत दाखल करणे आवश्यक राहिल टपालाने, कुरियर व इतर मार्गाने आणि विहीत कालावधीपेक्षा विलंबाने आपलोड केलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
14. निविदा मंजुर झालेल्या निविदाधारकाने विहीत कालावधीत काम पुर्ण न केल्यास व त्याचा निवडणुक कामावर परिणाम होऊ नये म्हणुन अन्य अभिकर्त्याकडुन काम करुन घ्यावे लागल्यास, तशा परिस्थितीत नव्या अभिकर्त्यांचा दर व मंजुर निविदाधारकाने दर्शविलेल्या दर यातील फरकाची जादा रक्कम निविदाधारकाकडुन एम.एल.आर.सी 1966 च्या तरतुदीनुसार जमिन महसुलाची थकबाकी म्हणुन वसुल करण्यात येईल. तसेच कामातील कसुरीखातर याची संपुर्ण अनामत रक्कम देखील शासन जमा करण्यात येईल.
15. मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेला Enumeration Forms, मतदार याद्या व इतर अनुषंगिक छपाईचे काम मंजुर झाल्यानंतर व कामाचे वाटप केल्यानंतर निविदा धारकाने काम नाकारल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन इतर दंडणीय कारवाई करण्यात येईल.
16. अभिकर्त्याने करुन दिलेल्या कामाची तपासणी केली जाईल व त्यावेळी कामाचा दर्जा विहीत केल्याप्रमाणे (चांगला) नसेल तर पुन्हा नव्याने काम करुन द्यावे लागेल व पुन्हा केलेल्या कामाचा वेगळा खर्च अदा केला जाणार नाही.
17. मतदारांचा तपशिल असलेला Enumeration Forms, मतदार याद्या इतर अनुषंगिक छपाईचे पाटपोट पृष्ठांची अंदाजीत संख्या 1696961 इतकी आहे (यात कमी जास्त होण्याची शक्यता आहे).
18. मतदारांचा तपशिल असलेला Enumeration Forms ,मतदार याद्या इतर अनुषंगिक छपाईसाठी PDF/CD या कार्यालयाकडून पुरविली जाईल.
19. शासन निर्णयानुसार वेळोवेळी अनिवार्य असलेले सर्व कर भरणे करणे निविदाधारकास बंधनकारक आहे.
20. सहायक नोंदणी अधिकारी यांचे प्रमाणसह देयके जिल्हाधिकारी जालना यांच्या नावे सादर करण्यात यावे.
21. Faulty यादीचे देयक अदा करण्यात येणार नाही.

22. लिफाफा B फॉर्म यावर (BOQ) मध्ये दर भरण्यात यावा व त्यावर निविदाधारकाने स्वातःची ई-स्वाक्षरी (डिजीटल सिग्नेचर) करणे आवश्यक आ निविदाधारकाने फॉर्म A मधील सर्व बाबीची पुर्तता केली असेल तरच त्याचा B फॉर्म Online व्दारे उघडण्यात येइल. अन्यथा संबंधिताची निविदा बाद करण्यात येईल.

23. तसेच छपाई दर निश्चित झालेल्या दिनांकापासून पुढील एक वर्षापर्यंत लागु राहतील किंवा गजर भासल्यास वेळोवेळी मुदतवाढ देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

24. अभिकर्त्यास अग्रीम ॲडव्हान्स देण्यात येणार नाही.

25. वरिल अटी व शर्तीची पुर्तता करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची असून कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग झाल्यास संपुर्ण अनामत जप्त करण्यात येईल.

26. निविदा स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता निविदा नाकरण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जालना यांनी राखून ठेवलेल्या असून कामाची निकड पाहून आवश्यक वाटल्यास अभिकर्त्यांस कोणतीही पुर्व सुचना न देता काम इतरत्र वाटुन देण्याचा अधिकार देखील आबाधित ठेवण्यात आलेला आहे.

27. निविदेबाबत कोणत्याही वाद संदर्भात जालना जिल्हा न्यायालयाचे कार्यक्षेत्र राहिल.

28. अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र स्कॅन करुन लिफाफा अ सोबत अपलोड करावा लागेल

29. छपाईचा दर बाजार भावाशी सुसंगत असावेत. तसेच दोन्ही बाजु/पाटपोट (Both Side) छपाई गृहीत धरुन ज्या निविदाधारकाचा दर कमी येईल त्याची निविदा स्विकारली जाईल. एक बाजु (Single Side) व दोन्ही बाजु (Both Side) साठी स्वतंत्र किमान दर नमुद निविदा स्विकारणे अथवा एकत्रित दोन्हीचा एकुण किमान दर स्विकारणे अथवा कार्यालयाला फायदेशीर ठरले त्याप्रमाणे निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जालना यांना असेल.

30. सदरील कामाच्या दर निश्चितीप्रक्रीये दरम्यान अथवा नंतर वरील सर्व अटी व शर्ती मधील एखादी अट शिथील करणे, रद्द करणे वा एखाद्या अटीचा नव्याने समावेश करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना असेल.

ठिकाण – जालना
दिनांक - 11/05/2026

(आशिमा मित्तल) भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, जालना**

**लिफाफा क्र.2 निविदेचा व्यापारी लिफाफा :-**

(व्यापारी लिफाफ्यातील दर तक्ता .xls मध्ये तयार करून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)

1. सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

2. ज्या निविदेत निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरांमध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल. जर अक्षरी व अंकी दरांमध्ये तफावत असल्यास दोन्हीपैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.

3. निविदाधारकाने दर नमुद करताना वस्तू व सेवासाठीची किंमत / खर्च व त्यासाठी भरावे लागणारे वेगवेगळे कर, वाहतूक खर्च हे स्वतंत्रपणे नमूद करुन त्याची एकूण होणारी रक्कम नमूद करावी.

4. निविदाधारकाने सादर केलेले निविदा कार्यारंभ आदेश दिलेल्या दिनांकापासून 01 वर्षापर्यंत स्वीकृतीस पात्र राहतील.

**सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) :-**

निविदाधारकाची निविदा मंजूर झाल्यांनतर 15 दिवसाच्या आत निविदेच्या 3% (तीन टक्के) सुरक्षा अनामत रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाने भरणे बंधनकारक राहिल. (या रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही) जर निविदाधारकाने निविदा स्वीकृतीच्या दिनांकापासून 15 दिवसाचे आत सुरक्षा अनामत रकमेचा भरणा केला नाही तर त्याची निविदा रद्द करण्यात येऊन त्यांचे निविदेसोबत भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

**करार (करार) :-**

मंजूर निविदाधारकास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जालनायांचेसोबत नियमानुसार अनुज्ञेय रकमेच्यास्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल. करारनाम्यामध्ये वरील अटी शर्तीचा समावेश राहील. तथापि, करारनामा करते वेळी या अटीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जालना यांनी राखून ठेवला आहे.

**L1 काढण्याची पद्धत :-**

ज्या निविदाधारकाचे सर्व करांच्या समावेशासह नमुद दर सर्वात कमी असतील अशी निविदा L1 काढण्यात येईल.

(आशिमा मित्तल) भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, जालना**

**प्रपत्र-1**

**स्वघोषणापत्र**

मी / आम्ही खालील सही करणार --------------------------- वय------------- रा ----------------- घोषणापत्र लिहून देतो की, आगामी मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे अनुषंगाने मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेल्या Enumeration Forms छपाई करण्याकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदा सुचना दि.------ अन्वये आम्ही सादर केलेल्या ई-निविदेमध्ये नमूद केलेली माहिती संपूर्णपणे खरी व बरोबर असून, सदर माहितीच्या पृष्ट्यर्थ मी आम्ही ई-निविदेसोबत सादर केलेली कागदपत्रे खरी व बरोबर आहेत.

मी / आम्ही असेही घोषीत करतो की, आमची फर्म मे.-------------------------------- शासकीय / निमशासकीय आस्थापना / संस्थाकडून कधीही निविदाधारकाच्या काळ्या यादीत समाविष्ट करण्यात आलेली नाही.

उपरोक्त नमूद माहिती चुकीची असल्यास अथवा खोटी आढळून आल्यास ई-निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर मी / आम्ही भा.दं.वि.1860 च्या कलम 199,200 अन्वये कायदेशीर अथवा दंडनीय कारवाईस पात्र ठरू तसेच आम्ही सादर केलेली निविदा अपात्र ठरेल याची आम्हास जाणीव आहे.

ठिकाण :- जालना

दिनांक : /05/2026

**निविदाधारकाची सही :-**

**निविदाधारकाचे संपूर्ण नाव :-**

**फर्म/ संस्थेचे नाव व पत्ता :-**

**मोबाईल नंबर :-**

# निविदेतील अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र

## (रु.500 स्टॅम्प पेपरवर द्यावयाचा मजकुर)

प्रति,

मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,

जालना

मी/आम्ही आगामी मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे अनुषंगाने मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेल्या Enumeration Forms छपाई करणेसाठी पुरवठादाराची नेमणूक करण्याकरिता सोबत जोडलेल्या प्रमाणे तांत्रिक व व्यापारी लिफाफ्यामध्ये ई-निविदा सादर करीत असून, सदर ई- निविदा सूचना आणि अटी व शर्ती मी/आम्ही पुर्णपणे वाचलेल्या असून, सदर अटी व शर्तीच्या आधीन राहून मी/आम्ही सदर ई-निविदा सादर करीत आहोत.

### प्रतिज्ञापत्र

मी याव्दारे प्रतिज्ञापत्र सादर करतो की, मी सादर केलेली निविदा मंजूर झाल्यास निविदेतील कामकाज मी उच्च गुणवत्तेने व दिलेल्या मुदतीत पार पाडेन व या कामाकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ, साधन सामुग्री निर्देशित केलेल्या वेळेत व विहीत ठिकाणी उपलब्ध करुन देईन. मला याबाबत पुर्ण कल्पना आहे की, माझ्या कामकाजात कोणत्याही प्रकारची कसुर/दिरंगाई अथवा हलगर्जीपणा झाल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जालनानिश्चित करतील अशा दंडास अथवा कायदेशिर शिक्षेस मी पात्र राहीन. निविदेतील अटी व शर्ती मला मंजुर असून त्या अटी व शर्तीचे मी पुर्णपणे पालन करीन.

1. निविदा ज्यांच्या कडुन दाखल करण्यात आलेल्या त्या संस्थेचे नाव व पत्ता:-
2. निविदाधारकांचे संपुर्ण नाव व पत्ता:-

निविदाधाकांची स्वाक्षरी

साक्षीदार

1. ............................स्वाक्षरी

2. ............................स्वाक्षरी

## ब - दराचा लिफाफा क्रमांक 2 (व्यवसायिक लिफाफा)

### आगामी मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे अनुषंगाने मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेल्या Enumeration Forms छपाई, मतदार याद्या व इतर अनुषंगिक छपाई करुन पुरवठा करणे बाबत दर केलेले फॉर्म

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | नग/प्रमाण | दैनिक दर ( सर्व कर, वाहतुक खर्च इ.सह) | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे अनुषंगाने मतदारांचे नाव व इतर तपशिल असलेला Enumeration Forms, मतदार यादी, बीएलओ रजिस्टर, नोटीस व इतर अनुषंगिक बाबींची छपाई. प्रति पृष्ठ (पाटपोट) A-4 साईज. (80 GSM) | 1 (दोन्ही बाजूस) | | |

**महत्वाचे – 1. Enumeration Forms, मतदार यादी व इतर अनुषंगिक बाबींची छपाई (पाटपोट) करीता दर 70 पैसे पेक्षा जास्त नसावा.**

**2. निविदाधारकाने दर नमुद करताना वस्तू व सेवासाठीची किंमत / खर्च व त्यासाठी भरावे लागणारे वेगवेगळे कर, वाहतूक खर्च हे स्वतंत्रपणे नमूद करुन त्याची एकूण होणारी रक्कम नमूद करावी.**

(उपरोक्त नमुद करण्यात येणाऱ्या दरामध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या व्यक्तीच्या शुल्कासहित समाविष्ट असावे. साहित्य ने-आण (ट्रान्सपोर्ट) करणेसाठी वेगळे शुल्क दिले जाणार नाहीत. निविदेतील दर सर्व करासहीत द्यावेत.)

ठिकाण :- जालना

दिनांक : / 05/2026

निविदाधारकाची सही :-

निविदाधारकाचे संपूर्ण नाव :-

फर्म/ संस्थेचे नाव व पत्ता :-

मोबाईल नंबर :-

Signature Not Verified

Digitally signed by Tushar Balasaheb Nikam
Date: 2026.05.11 15:52:18 IST
Location: Maharashtra-MH